# प्रकरण तिसरे

# 'अनाथ' कादंबरीचे : वाङ्मयीन परीक्षण

# प्रकरण : तिसरे

# 'अनाथ' कादंबरीचे : वाङ्मयीन परीक्षण

**प्रास्ताविक :**

माधव कोंडविलकर यांनी प्रामुख्याने कथा, कादंबरी, नाटक इत्यादी साहित्यप्रकार हाताळले आहेत. माधव कोंडविलकर यांच्या साहित्याचा अभ्यास केल्यानंतर असे दिसते की, यांच्या 'अनाथ' आणि 'आता उजाडेल' या महत्त्वाच्या कादंबऱ्या आहेत. त्यांच्या या दोन कादंबऱ्यावर फारसे कोणी परीक्षण केलेले नाही. कोंडविलकर एके ठिकाणी म्हणतात, " जीवनाचे वैविध्यपूर्ण चित्रण करावयाचे असेल तर कादंबरीसारखा दुसरा चांगला फॉर्म नाही. कादंबरीद्वारेच मी स्वतःला आणि माझ्यासकट इतरांना न्याय देऊ शकेन असा मला विश्वास वाटतो. "[१] प्रथम आपणाला माधव कोंडविलकर यांच्या 'अनाथ' या कादंबरीचा सर्वांगीण अभ्यास करावयाचा आहे.

माधव कोंडविलकर यांनी चर्मकार समाजाच्या सुख, दुःखाचे चित्रण आपल्या साहित्यातून आविष्कृत केले असल्याचे दिसून येते. या दृष्टीने कोंडविलकर यांची 'अनाथ' कादंबरी महत्त्वाची मानली जाते. प्रस्तूत कादंबरीचा नायक भास्करला वेळोवेळी लोकांनी दिलेली साथ उपयोगी पडते. वडील अशिक्षित असल्याने परपंरावादी असतात. पण भास्करची कोणत्याही परिस्थितीत शिक्षण पूर्ण करण्याची उत्तुंग इच्छा असते. यावर ही कादंबरी आधारलेली आहे. दलित म्हणून होणारी मानहानी, मुंबईतील जागेचा प्रश्न, गुंडगिरी व दारिद्र्य इत्यादीचे वर्णन प्रस्तुत कादंबरीत येते.

ग्रामीण व दलित जीवनाचा अनेक अंगाचे दर्शन अत्यंत प्रत्ययकारीपणे आणि तपशीलवारपणे घडविले आहे. अस्पृश्य समाज हा स्पृश्यांच्या अन्यायामुळे कसा

चिरडला गेला आहे, याचे चित्रण केले आहे. भीषण दारिद्र्य त्याने आलेली लाचारी ही वर्णने वाचून ग्रामीण जीवन, त्यातही अस्पृश्य समाजाचे जीवन अतिशय बिकट आहे. शसची जाणीव वाचकाला झाल्याशिवाय राहत नाही. आजही अस्पृश्यता नष्ट झाली नाही. बलुतेदारी पध्दती अजूनही ग्रामीण भागात अस्तिवात आहे.

या कादंबरीतील भास्कर, भिकाजी, गंगा, सोहनी गुरूजी, राधेकाकू राजानामा,सोन्या, गोपिका,रामा मोंडकर, पार्वती, शिवा इनकर, सीता, शामा इत्यादी पात्रे लेखकाने अत्यंत जिवंतपणे रेखाटली आहे.

ग्रामीण व दलित माणसाच्या स्वभावाचे कंगोरे अत्यंत संवेदनशीलतेने या कादंबरीत येतात. आशय आणि अविष्काराच्या दृष्टीने नाविन्यपूर्ण कादंबरीचा आपण सविस्तरपणे वाङ्मयीन अंगाने विचार करूया.

**'अनाथ' चे संविधानक :**

'मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे', 'अजून उजडायचं आहे' या कादंबऱ्यानंतर 'अनाथ' ही कादंबरी प्रकाशित झाली. पॉप्युलर प्रकाशाने ही कादंबरी १९८१ मध्ये प्रसिद्ध केली आहे. मुखपृष्ठ दत्तात्रय पाडेकर यांचे आहे. 'अनाथ' चे मुखपृष्ठ म्हणजे एका काटेरी निवडुंगावर फुललेलं एक टवटवीत ' पुष्प ' असे अर्थपूर्ण आहे. आत्मचरित्रपर साहित्य आजवर खूप लिहले गेले. मात्र माधव कोंडविलकर यांच्या कांदबऱ्यात प्रत्यक्ष जीवनातले अनमभव आहेत, परंतु कादंबरीच्या साच्यात घालून तिला आत्मचरित्रात्मक कादंबरीचे रूप दिल्याने इतर दलित आत्मचरित्रांहून त्यांचे लेखन अगदी वेगळ्या प्रकारचे आहे. सवर्ण समाजाकडून झालेला छळ, उपेक्षा यांचे वर्णन, त्यासंबंधीची चीड यामधून जाणवते. या छळाचे अवहेलनेचे एकांगी, अर्धवट

किंवा विकृत, आक्रस्ताले वर्णन करून त्यांनी वाचकांची सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्न आपल्या लेखनातून केलेला नाही.

भास्करच्या दुपदरी जीवनाभोवती 'अनाथ' चे कथासूत्र गुंफले आहे. लहानपासूनच हुशार असलेल्या भास्करला आपण शिकून खूप मोठे व्हावे, आपल्या आईचे ' हक्काची जमीन असण्याचे ' स्वप्न पूर्ण करावे असे मनोमन वाटत असते. परंतु त्याला घरातून कोणत्याही प्रकारचे प्रोत्साहन या बाबतीत मिळत नाही. सर्व स्वप्ने अपुरीच राहतात. कादंबरीतील भास्कर, भास्करचे आई-वडील, शिक्षक, त्यांचे इतर सर्व नातेवाईक यांच्या व्यक्तिरेखा लेखकाने अतिशय प्रभावीवणे रंगविल्या आहेत. या व्यक्तिरेखांच्या चित्रणातून त्यांचे दुःख बोलके झाले आहे.

दलित समाजातील बारकावे, आर्थिक दैन्य, शिक्षणाचा अभाव, अविकसित मने, संशयी वृत्ती, दुटप्पीपणा यांचे वर्णन माधव कोंडविलकर यांनी अतिशय प्रभावीपणे केली आहे. एक सुन्न करून टाकणारा अनुभव ही कादंबरी असून ती तृतीय पुरुषी निवेदन पद्धतीने लिहिली आहे.

भास्कर हा 'अनाथ' या कादंबरीचा नायक आहे. या कादंबरीमध्ये आई-वडील असूनही एका हुशार असणाऱ्या दलित मुलाच्या शोकांतिकेचे चित्रण आले आहे. भास्कर हा भिकाजी चांभाराचा मुलगा, शाळेत खुप हुशार असतो. या कादंबरीमध्ये भास्करने शिक्षणाविषयी केलेली धडपड दिसून येते. गावकुसाबाहेर राहणाऱ्या भिकाजी आणि गंगा या त्याच्या आईवडिलांची, गावगड्यातील बलुतेदार असलेल्या चर्मकार समाजाची ही कहाणी असल्याचे दिसून येते. रत्नागिरी जिल्ह्यातील 'देवाचे गोठणे' गावातील भास्कर बलुतेदारीचं लाचार आयुष्य नाकारायचं ठरवतो. भास्करचा बाप परंपरागत चर्मकार व गावाकीची कामे करीत असतो. आपल्या मुलानेही रुढी, परंपरेने चालत आलेला व्यवसाय करावा अशी भिकाजीची अपेक्षा असते. परंतु भास्करची

परंपरागत व्यवसायामध्ये न गुरफटता शिक्षण पूर्ण करुन नोकरी करून जीवन जगण्याची जबरदस्त इच्छा असते. सर्व गाव त्याच्या विरुद्ध असतो. इतकचं नव्हे तर स्वतःच्या बापालाही त्याचे शिक्षण पंसत नाही. शिक्षणाविषयी वडिलांच्या मनात चीड असते. म्हणूच तो भास्करला म्हणतो, 'शिक्षण घेऊन कोण मास्तर झालंयं. आता तू होणार आहेस.' अशा परिस्थितीत त्याच्या बाजूने सोहनी गुरूजी उभे राहतात.

भास्कर शाळेत हुशार असल्याने त्याला सोहनी गुरूजी प्रोत्साहन देतात. भास्करने बलुतं चालविण्याऐवजी मुंबईला शिक्षणासाठी जावे, असा आग्रह सोहनी गुरूजी धरतात. परंतु भास्करच्या बापाला (भिकाजीला) हे पंसत नसते.पण बाप दारूडा असूनही, सातवीपर्यत शिक्षण पूर्ण करतो. आर्थिक परिस्थिती अभावी त्याला आपले शिक्षण थांबवावे लागणार होते. पण त्यांच्या मनात पुढचे शिक्षण घेऊन मोठे होण्याची इच्छा असते. सोहनी गुरूजी भास्करच्या घरी येऊन घरी येऊन सागंतात. त्यामुळे मुंबईचा चुलता सोन्या भास्करला घरी नेऊन त्याचे पुढील शिक्षण पूर्ण करतो असे सांगितल्यामुळे त्याचे आई-वडील मुंबईला जाण्याची परवानगी देतात. भास्करने पुढे न शिकता गावकी सांभाळावी ही वडीलाची असणारी अपेक्षा; पण अखेर तो भास्कराला मुंबईला भावाकडे पाठवितो. तिथे भास्करची घरात व शहरात होणारी परवड हा 'अनाथ' कादंबरीचा मुख्य गाभा आहे. मुंबईला गेल्यावर चुलती गोपिका हेवेदावे काढते. भास्करच्या आईने पूर्वी केलेले भांडण ती उखरून काढते. कौटुंबिक हेवेदावे, मत्सर, पोटाचे हाल, मुंबईतील शाळा प्रवेशातील गैरप्रकार, दलित म्हणून शाळेतील प्रवेश नाकारणे असे वेगळे अनुभव भास्करला येतात.

मुंबईतील जीवन म्हणजे चाळीतील भांडणे, गुंडगिरी, दहशत, अपुरी जागा, अस्वच्छता त्यामुळे उद्‌भवणारे रोग आणि बायकावर घेतलेले जाणारे आळ असे आहे. मुंबईला एका चाळीतील चुलत्याचं खुराड्यासारखं असणारं बिऱ्हाड,

भोळाभाबडा चुलता, मनात द्वेष असणारी चुलती, त्याच्या माळ्यावर राहणारे पोटभाडेकरू आणि चाळीतील मवाली पोरे या सर्वांना भास्कर वैतागला असतो. 'भास्कर शिकत नाही. इकडे भलतेच धंदे करतो' असे खोटे पत्र भिकाजीला पाठविले जाते. तेव्हा वडील त्याला गावी बोलावतात. या त्रासमुळे गावी आई-वडिलांना न समजताच भास्कर घर सोडून पार्वती या बहिणीकडे राहयला जातो पण आगीतून फुफाटयात पडल्यागत त्याची अवस्था होते.

भास्करचा मेहुणा रामा एका झोपडपट्टीचा दादा आहे. त्याचा हातभट्टीचा धंदा असतो, 'शिक्षणाने काय होणार कपाळ, त्यापेक्षा धंद्यावर बस' असे बोलल्यामुळे त्याला अतोनात दुःख होते. एवढेच नाही तर मेहुणा दारूडा, घरी दोन लहान मुले, दारू विकण्याचा धंदा, भांडणे या सर्व कारणांना त्रासून भास्करचा अभ्यास होत नसे. जिकडं पहावं तिकडे माणसच माणसं, गटार, कुत्री, दारू, जुगार, मटका, तेथे चालत असलेले अनैतिक संबंध या साऱ्यांनी भास्करचं डोकं भांबावून जातं नको ती मुंबई आणि नको ते शिक्षण, उठावं नि गावाला पळून जावं, असं अनेकदा वाटते. चुलत्याचा आश्रय सोडून मेहुण्याकडे गेला म्हणून वडील भास्करवर संतापतात. वडीलांचं रागाचं पात्र वाचून भास्कर कमालीचा संतापतो. भास्कर त्यावेळी निश्चय करतो. 'काय वाट्टेल ते झालं तरी चालेल, गावाला परत जायचं नाही. गावचे तोंडही पहायचे नाही. उपाशी मरू. पण गावचे नाव नको' असा निश्चय करतो.

शेवटी भास्करला त्याच झोपडपट्टीत शामा नावाचा जिवाभावाचा, निस्वार्थी मित्र भेटतो. तो मवाली असला तरी मनाने खूप चांगला असतो. पडत्या काळात भास्करला आधार देतो. 'अनाथ' कादंबरीत भास्करची गावाने, तिथल्या सवर्णांनी केलेली फरफट पाहून मन सुन्न होते. चर्मकार समाज अंधश्रद्धा, हेवेदावे आणि द्वेष, मत्सरात बुडालेला आहे. पुढे जाणाऱ्यांचे पाय खेकडा प्रवृत्तीने खेचणे, सूड घेणे यात

मग्न आहे. 'अनाथ' मधील दलित समाज जनावरासारखे जिणे जगतो. लेखकाने 'अनाथ' ही कादंबरी लिहून वाचकाला विचार करायला प्रवृत्त केले आहे. अशाप्रकारे 'अनाथ' कादंबरीतील कथानकाचे स्थूल स्वरूप आपण अभ्यासले, यानंतर या कादंबरीचा सांगोपांग अभ्यास करू. यात प्रथम या कादंबरीतील व्यक्तिचित्रणाचा अभ्यास करणे योग्य ठरेल.

**'अनाथ' मधील व्यक्तिरेखा :**

कादंबरीच्या प्रमुख घटकापैकी व्यक्तिरेखा हा महत्त्वाचा घटक आहे किंवा ते वैशिष्ट्य आहे. कादंबरीचे कथानक हे व्यक्तिच्याद्वारे ( पात्राच्याद्वारे ) पुढे सरकत रहाते, व वाचकांना कादंबरीचा आशय समजतो. त्यासाठी 'व्यक्तिरेखा' ह्या नीटनेटक्या, सुस्पष्ट, ठसठसीत व जीवंत स्वभावाच्या, असाव्यात. प्रस्तुत कादंबरीत या व्यक्तिरेखा अत्यंत प्रभावीपणे, जीवंत रसरसीत उतरल्या आहेत.

**भास्कर :**

' भास्कर ' हा प्रस्तुत कादंबरीचा ' नायक ' आहे. कादंबरीतील सर्व घटनांचा संबंध भास्करशी आहे.

अनाथ 'कादंबरीचा नायक भास्कर भोवती कादंबरीचे कथानक गुंफलेले आहे. कादंबरीची सुरूवात भास्करने शेतात केलेल्या कामापासून झाली आहे. 'अनाथ' ही कादंबरी कोकणातल्या खेड्यात शिकणाऱ्या भिकाजी चांभारच्या मुलाची 'भास्कर' ची कथा आहे.

भास्करच्या घरची परिस्थिती गरिबीची असूनही शिक्षणाची धडपड तो सोडत नाही. त्याचे वडील व्यसनी असल्यामुळे त्यांच्याविषयी राग आहे. घरच्या परिस्थितीमुळे वडील सातवी नंतरचे शिक्षण थांबवणार होते, त्याचवेळी सोहनी

गुरूजींनी त्याला प्रोत्साहन व मार्गदर्शन केल्याने पुढचे शिक्षण घेण्यासाठी तो मुंबईला चुलत्याकडे जातो. भास्कर वर्गात सर्व मुलात हुशार असल्यामुळे गुरूजींना त्याच्याविषयी प्रेम, आपुलकी, वाटते. म्हणूनच गुरूजी भास्करच्या घरी जाऊन वडिलांचे शिक्षणाविषयी असणारे नकारार्थी विचार होकारार्थी करून त्याला मुंबईला पाठविण्याचा सल्ला देतात.

मुलाने बलुतं सांभाळावे अशी वडिलांची इच्छा असते. पण भास्कर या गोष्टीला छेद देतो. एखादी नोकरी करावी अशी आशा बाळगतो. म्हणूनच इच्छा असेल तिथे मार्ग मिळतो या उक्तीप्रमाणे अनेक संकटांना तोंड देत तो शिक्षण पूर्ण करतो. चर्मकार लोकांना सवर्णाकडून मिळत असणारी तुच्छतेची वागणूक त्याला पंसत नसल्याने मुंबईला जातो. वडील अशिक्षित, अंधश्रद्धा बाळगणारे असल्याने वडिलांना शिक्षणाचे महत्त्व वाटत नाही. म्हणून ते भास्करला म्हणतात, ‘‘एक दिवस अभ्यास केलास नाय, म्हणून काय बिघडणार आहे काय? काय मोठा अभ्यासवाला तो?’’[२] असे त्याच्यावर भडकतात परतुं भास्कर अशा येणाऱ्या परिस्थितीला डगमगता तोंड देतो. चर्मकार व्यवसायाबद्दल भास्करच्या मनात तिटकारा असला तरी वेळोवेळी आई-वडिलांना तो मदत करीत असतो. आईला प्रत्येक गोष्टीत मदत करतो यातून भास्करच्या मनामध्ये असणारे आई बद्दल प्रेम, जिव्हाळा दिसतो. व्यवसायामध्ये वडिलांना मदत करताना चुना तयार करणे, वाहाणा पोहोचविणे, बलुतं गोळा करणे असे अनेक प्रकारचे काम करीत असताना आलेल्या अनुभवामुळे तो बेजार होते. एक दलिताचा मुलगा म्हणून गावाकडून मिळणारी हीनतेची वागणूक पशुहूनही खालच्या दर्जाची आहे, याची त्याला चीड येते.

एकदा भिकाजी घर सोडून गेला असता भास्करने आईला एकटेपणा वाटू न देता तिच्या बरोबर रानात लाकडे गोळा करण्यासाठी जातो. यावरून कष्टाळू वृत्ती, आईविषयी असणारे प्रेम हे गुण दिसतात. भास्कर शाळेतून आल्यानंतर सर्वत्र पडलेले सामसन लावून घर आवरतो यातून स्वच्छता हा गुण घेण्यासारखा आहे. घरची गरिबी आणि घरात असणारी व्यसनाधीनता यामुळे त्याला दुःख होते. व्यसनाधीनता ही एखाद्या कुटुंबाच्या नाशाला, दारिद्र्याला कारणीभूत ठरू शकते, असा दूरदृष्टीकोन भास्करच्या मनात असल्याने त्यापासून लांब राहतो.

भास्कर हा होतकरु असून एकदा वाचायला लागला की त्यामध्ये स्वतःला हरवून जायचा. त्याला वेलस्ली, डलहौसी, लॉर्ड कर्झन, माऊंट बॅटन याचं ज्ञान लहानपणापासूनच आत्मसात होते. राणीचा जाहीरनामा, प्लासीची लढाई, पानिपतचं युद्ध, पेशव्यांचा पराभव या वाचनाचा प्रभाव त्याच्यावर पडलेला आहे. मुंबईतील शाळा प्रवेशाकरिता भास्करला ॲडमिशन देण्याचे ठरले असूनही दलित म्हणून नाकारले जाते. या अनुभवामुळे भास्करला चीड येते. मुंबईत चुलत्याच्या घरी असताना त्याला अनेक कामे करावी लागतात. चुलत्याबरोबर भांडण करून भास्कर आपल्या मेहुण्याकडे राहण्यासाठी येतो. तेथे ही भास्करला कल्पनेपेक्षा ही वेगळा अनुभव येतो. असे अनेक कटु अनुभव आले असले तरी देखील भास्करने शिक्षणाची कास सोडली नाही. यातून त्याच्या मनात असणारी जिद्द दिसते.

शेवटी भास्करला मुंबईच्या झोपडपट्टीतील शामा नावाचा मित्र भेटतो. तो दारूडा, खिसेकापू, गुंडागिरी करत असूनही भास्कर त्याच्या संगतीने व्यसनी बनत नाही. हे त्याचे वेगळेपण दिसते. शामा वेळोवेळी मदत करून त्याची घरच्यासारखी विचारपूस करतो. त्यामुळे भास्करला रक्ताच्या नात्यापेक्षा मानलेली नाती श्रेष्ठ वाटतात.

अशाप्रकारे भास्कर भविष्याची स्वप्ने घेऊन पुढील शिक्षणासाठी मुंबईला येतो. गाव सोडताच बाहेरच्या जीवनातील चटके जाणवू लागतात. मुंबईच्या वास्तव्यात त्याच्या सर्व स्वप्नपंचा चुराडा होतो. मुंबईच्या उपनगरातील चाळीतल्या वस्तीचे ओगंळवाने रूप त्याला असह्य होते.शाळेत प्रवेश मिळविण्यासाठी वणवण सहन करावी लागली. त्याला प्रवेश मिळतो तो ही नाईट स्कूलमध्ये, नोकरी व शिक्षण त्याला एकाच वेळी करावे लागते. काकूचा जाच, बहिणीचा जाच त्याला नकोसा होतो. बाहेरच्या मित्रांची संगत, अभ्यासाची फारकत, आईवडिलांचे गैरसमज यासर्वांचा परिणाम म्हणून उरी बाळगलेली स्वप्ने अपुरीच राहतात. एवढ्या मोठ्या नगरात व स्वतःच्या जगात 'अनाथ' च राहतो.

**भिकाजी :**

भिकाजी हा भास्करचा बाप आहे. भारतीय वर्णव्यवस्थेमध्ये भरडल्या गेलेल्या दलित समाजातील चांभार जातीत भिकाजीचा जन्म झाला. त्यामुळे भिकाजीच्या वाट्याला जन्मापासून गरिबी आहे. तो चांभारकीचा व्यवसाय करुन उदरनिर्वाह चालवित असे. जगात कष्ट करून खाऊ इच्छिणाऱ्या माणसाला न्याय मिळतोच असे नाही. हे येथे भिकाजीच्या व्यक्तिरेखेतून स्पष्ट होते.

चर्मकार व्यवसाय करण्यासाठी आरी, रापी या मोजक्या साधनांच्या आधारे काम करतो. राबराब राबून त्याला दोनं वेळचं साधं अन्नही मिळू शकत नाही. चप्पल साधायला थोडा वेळ झाला तर भिकाजीच्या कानशिल्यात मारले जाते. एवढे काम करुन भिकाजीला योग्य तो मोबदला मिळत नाही. म्हणूनचं भिकाजी म्हणतो, " दिवसभर आपला धान्याच्या बैलागत मरमर मर्ताय. पन इतका करुन सवरून सुद्धा गांडीस नाय लंगोटी मागास लागते."[३] या विधानावरून त्याचा दलित म्हणून होणारा

त्रास व  घरची गरिबी  दिसते. चर्मकार व्यवसाय करायचा सोडला तर गावकरी आपणास मारतील, गावातून हाकलून लावतील या भीतीने गावात राहून काम करतो.

कितीही अन्याय झाला तरी तो कुठे पेटून उठताना दिसत नाही. तसेच यापलीकडे त्याची बंडखोरी कुठेच दिसत नाही. गावातील प्रत्येक व्यक्तिच्या वागण्याचा परिणाम मात्र भिकाजीला भागावा लागतो. या कादंबरीतील भिकाजीचे चित्रण म्हणजे वेदनेचे चित्रण होय. आपले जीवन वाया जाऊ दे निदान आपल्या मुलाला शिकवून  मोठा करावे असे भिकाजी व गंगाला वाटते.

भिकाजी आपल्या व्यवसायामध्ये खूप गुंतला आहे. आजच चप्पल लावून दे अशी प्रत्येकाची घाई चालेली आहे. पडवीच्या कापरात जुन्या फाटक्या वाहाणांचा ढीग दुरूस्तीसाठी पडला होता. अगदी अविश्रांत काम करायचं म्हणटलं तरी एकट्या भिकाजीला जोड लावणं शक्य नाही. एका जोडीला कमीत कमी एक तास तरी लागतो. गावातल्या बारा वाड्यापैकी सहा वाड्यांचे काम भिकाजीला करावे लागत असे. गाववाल्यांच्या मर्जीप्रमाणे काम करायचं असा भिकाजीच्या पणजोबापासून अलिखित नियम आहे. भिकाजी त्याला अपवाद करसा असणार? कोणी काही म्हटलं, एखादवेळी फटकारलं तरी तो निमूटपने सहन करत होता. तोंड उघडायला त्याला परवानगीच नव्हती. भिकाजीला कामाच्या रेट्यामुळे थांबता येत नव्हतं, आणि पळूनही जाता येत नव्हतं, कोंडून मारल्यासारखी त्याची अवस्था झाली होती. गावाच्या मर्जीनुसार काम करावं. त्यांचे विखारी बोल मनावर झेपावेत हूं की चूं करू नये. अशी त्याची अवस्था होती. जिवंत असून मृत यातना भिकाजी भोगत होता. खाल्लेलं पान थुंकायलाही गाववाले त्याला वेळ देत नव्हते. गावचे काम सचोटीने करूनही भिकाजी गावाच्या दृष्टीने गुन्हेगार होता. वेठबिगाराला निदान वेठबिगारी मिळते. पण भिकाजीला काहीच मिळत नाही.अपमानित जीणं त्याला जगावं लागतं.

संपूर्ण गावाचे काम करून भीक मागत जगायचे हा कोणता न्याय आहे? भिकाजीला व्यक्तिग त जीवनात सुख नाही. रोजचे जीवन त्याला युद्ध पातळीवर जगावे लागते. कितीही राबलं तरी पोटाची खळगी भरत नाहीत. कोणत्याच कामात भिकाजीला यश नााही. नियतीच्या फेऱ्यात अडकलेली ही व्यक्तिरेखा आहे. गावातून उधारी उसनवारी करणे, अन्न मागून आणणे लोकांचे निष्कारण बोलून घ्यावे लागत असे. स्वतःला वाचवण्यासाठी खोटं बोलणे शेवठी सर्वत्रच अपयश आल्यावर स्वतःच्या नशीबाला दोष देतो. भिकाजी स्वतःच्या फाटक्या संसाराला टाके घालू शकत नाही हे त्याचे मोठे दुर्देव आहे. वेदनेचे बोलके चित्रण म्हणजे भिकाजी ही व्यक्तिरेखा होय.

अशाप्रकारे भिकाजी काबाडकष्ट करून जीवन जगतो. तो परंपरावादी विचाराचा, मुलाच्या शिक्षणासाठी हातभार लावणारा आणि वेळप्रसंगी तडजोड करणारा आहे. 'अनाथ' कादंबरीमध्ये भिकाजी या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून तत्कालीन चर्मकार समाजातील वास्तव परिस्थितीचे चित्रण माधव कोंडविलकर यांनी केले आहे. व्यावसायिकतून आलेले भिकाजीचे दुःख व त्याची मानसिक कसरत माधव कोंडविलकर यांनी यशस्वीपणे मांडलेली आहे.

**गंगा :**

'अनाथ' या कादंबरीतील गंगा ही व्यक्तिरेखा भिकाजी इतकीच महत्त्वाची आहे. याचे मुख्य कारण म्हणजे तिचा धाडसी व स्वभिमानी स्वभाव होय. ती पतिनिष्ठ आहे. नवऱ्याबरोबर जीवनाचा कैदखाना ती आनंदाने भोगते. प्रसंगी भिकाजीला सावरते. गंगामुळेच भिकाजी उभा आहे असे जाणवते. सतत कष्ट करणारी, प्रसंगी बंडखोर बनणारी ठिणगी म्हणजे गंगा ही व्यक्तिरेखा होय. तिच्या घरातील दुकानाच्या साहित्यासह वस्तू मोजल्या तर पंचवीस तीसच्या वर तिच्या

संसारात वस्तू नाहीत. ज्याच्या घरात दारिद्र्य सोबतीला आहे अशा भिकाजीच्या कुटुंबाची ती रखवालदारा आहे असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

संकटाला धीरानं तोंड देण्याची ताकद तिच्यात आहे. तिला आपले कुटुंब वर आणायचे आहे. आपल्या मुलाचं शिक्षणाचं स्वप्न पुर्ण करण्याचा गंगाचा मानस आहे. गंगा ही कुटुंबवत्सल स्त्री आहे. नवऱ्याच्या बरोबरीने ती त्याला मदत करते. सुगीच्या दिवसात तासन तास थांबून भात गोळा करते. काहीवेळा अपमानही सहन करते.

गंगा ही भास्करची आई. तिच्या व्यक्तिरेखेतून भारतीय स्त्रिया प्रतिनिधीत्वाचे दर्शन लेखकाने घडविले आहे. ती भास्करवर जीवापाड प्रेम करते. आपणाला शेती नाही याची गंगाला खंत वाटते. स्वतःची शेती असावी असे असणारे स्वप्न भास्करकडून साकार होईल अशी तिची अपेक्षा असते. चुना तयार करण्यासाठी गंगाला जंगलातून लाकडं शोधून आणणे, शेण गोळा करणे, गोवऱ्या लावणे, ऐनाच्या साली काढून त्याचा भुगा करणे, चुन्यासाठी शिपया जमवणे अशी कष्टाची कामे करावी लागत. गंगा ही जे आहे त्यामध्ये समाधान मानून संसार करणारी कष्टाळूवृत्तीची आहे. रोज अविश्रांत काम करुन ही कधी निराश होत नाही. भास्करचे जीवन सुखात जावे म्हणून ती देवाला आळविते. यातून अंधश्रद्धा दिसून येते. मुलाच्या शिक्षणाविषयी काळजी करणारी आई माधव कोंडविलकर यांनी गंगाच्या माध्यमातून दाखविली. भास्करचे शिक्षण व्यवस्थित पुर्ण व्हावे म्हणून पंचांग पाहणे, देवाला गाऱ्हाणे घालणे यासारखे उपाय ती करते. यातून ती दैववादी आहे असे दिसते. भास्कर मुंबईला जातेवेळी गंगा समजावून सांगत असते की, चुलता चुलती यांना हाक मारत जा. जीव संभाळून अभ्यास कर, बाहेर फिरू नको, मुंबईची पोरं मवाली असतात. अशा तऱ्हेने

बाहेरच्या जगाची ओळख करून देऊन त्याला तोंड कसे द्यावे यासाठी मार्गदर्शन करते.

गंगा ही जिद्दी स्त्री आहे. आपल्या मुलाने शिकावे ही गंगाची इच्छा आहे . नवऱ्याच्या विचित्र स्वभावाला तीही कंटाळली आहे म्हणूनच ' मला काय पाहून या घरात दिलीत. ' असा जाब ती भावाला विचारते. गंगीच्या रूपात सर्व गरीब असहाय्य स्त्रीवर्गाचं दुःख सचेतन झालं आहे. बोलकं झालं आहे. गंगाच्या माध्यमातून शिक्षणाला महत्त्व देणारी, सुसंस्कार करणारी एक आदर्श स्त्री लेखकाने दाखविली आहे.

**सोहनी गुरूजी :**

'अनाथ' कादंबरीमधील महत्त्वाची व्यक्तिरेखा म्हणजे सोहनी गुरूजी होय. सोहनी गुरुजी हे भास्करचे शिक्षक आहेत. भास्करला शिक्षणाविषयी प्रोत्साहन व महत्त्व पटवून देतात. सोहनी गुरूजींच्या विचारातून मानवतावादी दृष्टीकोन पााहावयास मिळतो. भास्करच्या बालमनावर सुंस्कार करणारे पात्र म्हणजे सोहनी गुरूजी. भास्कर हा अभ्यासू असल्याने त्याला गुरूजी म्हणतात, 'शिकून मोठा हो, नोकरी कर, आई-बाबांना सुखी ठेव, अशी बालमनावर चांगली मुल्ये रुजवितात.

भास्करचे वडील घरच्या गरिबीमुळे शिक्षण नको म्हणत असतात. त्यावेळी गुरूजी भिकाजीला शिक्षणाचे महत्त्व पटवून देतात. तसेच रूढी परपंरेने चालत आलेल्या व्यवसायामध्ये न गुरफटता ते एका नव्या विचाराला चालना देतात. सोहनी गुरूजी विद्यार्थांना कळवळून सांगतात की, ''तुम्ही उनाडक्या करू नका, शाळा चुकवू नका, सतत ज्ञान मिळवा, ज्ञानासारखं जगात दुसरं काहीचं चांगल नाही. पैसा साठवला तर चोराची भीती असते. पण तुमचे ज्ञान कोणी चोरून देत नाही. पैसा

दुसऱ्याला दिला तर कमी होतो. ज्ञानाचं तसं नाही. ते दुसऱ्याला दिल्याने वाढते.''[४] असे सांगून शिक्षणाविषयीचे महत्त्व पटवून देतात. यामधून सोहनी गुरूजी यांची ज्ञानाकडे पाहाण्याची विधायक दृष्टी दिसते.

सोहनी गुरूजी यांचे स्वप्न होते की, '' मुलं मोठी व्हावीत, त्यांना वेगवेगळ्या प्रांतात जावे, कोणी मंत्री व्हावे, कोणी पुढारी व्हावे, कोणी देशभक्त व्हावे, नेता व्हावे, देशाचं नाव उज्ज्वल करावे ''[५] पानसुपारीच्या कपड्यावर डाग पडल्याने कपडे खराब झाली म्हणून पानाच्या व्यसनापासून लांब जातात. अशा पद्धतीने सोहणी गुरूजी यांच्या वर्तनातून अनेक गुण घेण्यासारखे आहेत. शिक्षणाचे महत्त्व पटल्याने दुसऱ्याला चांगला मार्ग देणारे, ज्ञानाचे महत्त्व पटवून देणारे, राष्ट्रीयत्वाची भावना विद्यार्थ्यांच्यात बिंबवणारे, व्यसनाचे धोके ओळखून व्यसनापासून दूर राहणारे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व म्हणजे सोहनी गुरूजी होय.

**राधेकाकू :**

राधेकाकू ही सोहनी गुरूजी यांची पत्नी. ती सवर्ण असल्यामुळे सोवळे पाळते. एकदा ती भास्करशी बोलत असताना म्हणते की, आपल्या मिळकतीप्रमाणे खर्च करावा, काटकसर करावी हे दलित लोकांना कळत नाही. 'मिळेल तेव्हा तुपाशी आणि नसेल तेव्हा उपाशी' अशी वृत्ती या लोकांना असते. हे वागणे राधेकाकूला पसंत नाही. यातून त्या कडक शिस्तीच्या असलेल्या दिसतात. तसेच त्यांचे सोवळेही फार कडक आहे.

ती भास्करला घरात बोलावून सांगताना म्हणते, ''अरे, तुमचे लोक कसे तरी वागतात, एवढचं नाही तर दारूमाडी पितात. ती घाणेरडी, अस्वच्छ वागतात. त्यामुळे मला माणसं आवडत नाही. तू स्वच्छ वागतोच तेव्हा तुला दलित कोण म्हणणार

नाही. तू आमच्यासारखा वागतोस व बोलतोस याचं मला समाधान वाटतं. माणसांना स्वच्छ राहायला काही पैसे पडत नाहीत, देवानं एवढं पाणी दिलं आहे त्याचा भरपूर उपययोग करून घ्यावा. रोज अंधोळ करावी, स्वच्छ कपडे घालावित, घर नीटनेटकं ठेवावं, देवाधर्माचं नाव घ्यावं त्यानं मन उल्हासित होतं. ''[६] यातून राधेकाकू जातीपेक्षा स्वच्छतेला महत्त्व देताना दिसते. माणसाने मिळकतीप्रमाणे खर्च करावा म्हणजे 'अंथरून पाहून पाय पसरावे' या उक्तीप्रमाणे राधेकाकूला म्हणायचे आहे. तिच्यामध्ये स्पष्टवक्तेपणा, दैववादीवृत्ती, व्यसनी लोकांबद्दल तिटकारा आणि बालमनावर सुसंस्कार करणे यासारख्या प्रश्नावर तिने प्रकाश टाकला आहे.

**राजामामा :**

राजा हा भास्करचा मामा आहे. तो चर्मकार समाजातील असला तरी त्याचे जीवन कष्टकरी शेतकऱ्याचे आहे. मामा जमिनीला पाणी पाजीत असताना भास्करला म्हणतो, ''कष्ट करणाऱ्याला ती पोटापुरतं दिल्याशिवाय राहत नाही.''[७] असा शेतकऱ्यांना संदेश देतो. राजामामा शेती असल्याने चर्मकार व्यवसाय नाकारतो. त्यांच्या घरी जनावरे आहेत. त्याची राबण्याची कष्टाळूवृत्ती, जनावराबद्दल जिव्हाळा दिससो.

भास्कर सुट्टीहून गावी जाताना त्याच्या पाठीवरून हात फिरवून मामा म्हणतो की, ''आई वडील अडाणी राहिले म्हणून असे फसले. तू चांगला शीक.''[८] असा शिक्षणाविषयी मोलाचा संदेश देऊन जातीयतेला नाकारून शिक्षणाचे महत्त्व पटवून देतो. भास्करच्या वडिलांना पंरपरागत व्यवसाय सोडून शेती करा असा उपदेश करतो. असा हा राजामामा शेतीचे महत्त्व पटवून शेतकऱ्यांना संदेश देणारा, जातीयतेला नाकारणारा, शिक्षणाला महत्त्व देणारा, कष्टाळूवृत्तीचा आहे.

**सोन्या :**

सोन्या हा भास्करचा चुलता आहे. तो मुंबईला राहत असतो. सोन्याचे कोणत्याही प्रकारचे शिक्षण झालेले नसते. स्वतः शिकलो नाही याची खंत असल्याने आपल्या मुलांनी खूप शिकावे, नोकरी करावी अशी सोन्याची अपेक्षा असते. त्यामुळे तो भास्करला पुढील शिक्षणासाठी मुंबईला घेऊन येतो. शिक्षणाचा अभाव असल्याने सोन्याला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते शिक्षणाशिवाय समाजात किंमत नाही म्हणून आपल्या समाजातील मुलांनी शिक्षण घेऊन मोठ्या पदावर जावावे असे त्याला वाटत असते. तो अशिक्षित असतानाही शिक्षणाला महत्त्व देतो.

आपण कोणाचं वाईट केलं तर देव आपलं वाईट करेल अशी त्याची धारणा असते. यावरून तो परंपरावादी असल्याचे दिसते. स्वतःचे अस्तित्त्व निर्माण करायचे असेल तर शिक्षण घेतल्याशिवाय गत्यंतर नाही. हे सोन्या या पात्राच्या माध्यमातून सांगावयाचे आहे असे वाटते. सोन्या अशिक्षित, व्यसनी असून त्याची शिक्षणाविषयीची तळमळ दिसते.

**गोपिका :**

गोपिका ही सोन्याची पत्नी आहे. ती स्वभावाने कडक, भांडखोर वृत्तीची आणि अहंमपणा असणारी स्त्री आहे. ती पूर्वीच्या भांडणाचे कारण घेऊन भास्करला त्रास देत असते. स्वतःचे खरे मानून नवऱ्याला मुठीत ठेवणारी, सडेतोड, आक्राळविक्राळ रूप धारण करणारी स्त्री दाखविली आहे. आक्रमक स्त्रीचं दर्शन या पात्राच्या दाखविले आहे. तिचे असे वागणे म्हणजे तिच्या अशिक्षितपणाचे लक्षण आहे. हेच लेखकाला या ठिकाणी सांगावयाचे आहे.

**रामा मोंडकर :**

रामा हा भास्करचा मेहुणा स्वभावाने स्पष्ट बोलणारा आहे. भास्करला त्याच्या चुलत्याने राहण्यास नकार दिल्यानंतर तो म्हणतो, "भास्कर भावोजी, त्यांनी नाही शिकवलं तरी काही हरकत नाही. तुम्ही बिलकूल घाबरू नका. तुम्हाला शिकायचं ना? मी शिकवतो."[१] यावरून भास्करला पडत्या काळात आधार देतो. रामा मोंडकर या पात्राद्वारे कोंडविलकर यांनी एक अशिक्षित माणूस कायदयाचा आधार घेऊन कसा बोलतो हे दाखवले आहे. तो अशिक्षित असूनही कायद्याची माहिती, बोलण्याची ढब याची ओळख करून दिली आहे. बायकांना सांभाळायला अक्कल लागते. शिकलेल्या बायकांना तर फार जपावे लागते. म्हणून पायातली वाहाण पायात बरी ती पायाच्या बाहेर गेली की, तिची शोभा जाते. अशा रीतीने स्त्रीकडे कमीपणाच्या नजरेतून पाहतो. भास्करला दारूच्या अड्ड्यावर बसवून दारू विकणे, बाटल्या पुसणे अशी घरची कामे करून घेतो. रामा मोंडकरच्या बोलण्यातून जाणवणारा अहंमपणा, स्वतःचेच खरे म्हणण्याची वृत्ती, दुसऱ्याला कमी लेखने, स्त्रीकडे बघण्याची हीनवृत्ती असे या पात्राचे रूप कादंबरीत दिसते.

**पार्वती :**

पार्वती ही भास्करची बहीण असून स्त्रीच्या वाट्याला आलेले दुःखद अनुभव निमुटपणे सहन करते. भारतीय स्त्रीचे प्रतिनिधीत्व करून परंपरावादी स्त्रीची भूमिका वटवताना दिसते. माधव कोंडविलकर यांनी पार्वती या पात्राचा आधार घेऊन चर्मकार समाजात होणारी स्त्रीची घुसमट निदर्शनास आणून दिली आहे. ही घुसमट एका पार्वतीची नसून सर्व भारतीय स्त्रियांची आहे. या वास्तव घटनेवर प्रकाश टाकला आहे.

एकदा रामा स्वतःची स्तुती करताना पार्वती हसते त्यावेळी तिच्यावर भडकतो यातून तिची होणारी घुसमट निदर्शनास आणली आहे, म्हणून पार्वतीला दोन माणसे बोलत असताना मध्ये न बोलता फक्त बोलणे ऐकावे लागते. ती पतीबरोबर सुद्धा मनमोकळेपणानं बोलू शकत नाही. दोघांच्यामध्ये तरी पार्वती बोलली तरी तिचा पती तिला मारहाण करायचा. एकदा तर चहा लवकर बनविला नाही, म्हणून तिच्या कमरेत लाथ घालतो यावरून आजही स्त्रीवर किती अन्याय होतो. हे पार्वतीच्या व्यक्तिरेखेतून दाखविले आहे. पार्वती नवऱ्याचा त्रास सहन करूनही, 'पती' हाच परमेश्वर मानून भारतीय स्त्रीचे प्रतिनिधीत्व करते हे लेखकाने नजरेस आणून दिले आहे.

**शिवा इनरकर :**

शिवा हा सीताचा नवरा आहे. तो मुंबईतील सूत गिरणीत काम करीत असतो. अशिक्षित असून भाषेच्या प्रभूत्वामुळे दुसऱ्यावर छाप पाडण्याचे कौशल्य त्याच्यात आहे. स्वतः व्यवसनाच्या आहारी गेला असून मोठमोठे लोक व्यसनी आहेत असे बोलून समर्थन करतो. शिवा व्यसनी बापाला सडेतोड विचारतो. ''जन्माला घालण्याच्या पलीकडे तू माझं काय केलस? आता गळ्यात ढेंग घेऊन बसलाय आणि मला मोटेगिरी सांगतोय.''[१०] असा वडिलांच्यावर राग व्यक्त करतो. वडिलांच्याकडून शिवाला प्रेम, जिव्हाळा मिळत नाही. पोटभर अन्नही मिळाले नाही म्हणून शिवा खंत व्यक्त करतो.

सीताच्या व्यसनी वडिलाचा फायदा घेऊन तिच्याशी लग्न करून नंतर तिचा छळ करतो. सीताच्या आवडी निवडीचा विचार न करता तिचा कोंडमारा करतो. एकदा तिने आवडीचा फ्रॉक घातला असता रक्त फुटेपर्यंत मारुन घरातील सर्वांच्या

पाया पडून माफी मागायला सांगतो. यातून लग्नानंतर बदलेला पुरुष स्त्रीला किती दुःख देतो हे दाखविले आहे. शिवा या पात्राच्या माध्यमातून पुरुषसत्ताक पद्धतीचे दर्शन घडविले आहे. त्यांनी एका स्त्रीचा केलेला छळ मनाला चटका लावून जातो. याचे प्रमुख कारण व्यसन हे आहे.

**सीता :**

सीता ही शिवाची पत्नी आहे. शाळेत खूप हुशार असते. सीता शिकली सवरली असूनही नवऱ्याकडून, तिची घुसमट होताना दिसते. वडील व्यसनी असल्यामुळे तिला माहेरी व सासरी कुठेच समाधान मिळाले नाही. तिची अवस्था 'ना घर का ना घाट का' या म्हणीप्रमाणे होते.

पुस्तकात रमणाऱ्या मुलीचे शिक्षण थांबवून तिचे वडील शिवाबरोबर लग्न करून देतात. मनात नसतानाही जबरदस्तीने लग्न केले जाते. तेव्हा सीता ओक्साबोक्सी रडायला लागते. त्यावेळी सीता म्हणते, "मला इतक्यात लग्न करायचे नाही. मी खूप खूप शिकणार आहे."[११] यातून तिची शिक्षणाविषयाची आवड दिसते, पण वडिलांच्या समोर ती काहीचं बोलू शकत नाही. शिवाने लग्नाअगोदर सीताकडून कशाचीही अपेक्षा केलेली नसते, मात्र लग्नानंतर तो तिला त्रास देऊ लागतो. एवढच नाही तर तिने कोणती वस्त्र परिधान करायची, कसे वागायचे यावर अटी घालतो. यामधून पुरुषांचे असणारे वर्चस्व दाखविले आहे. नवऱ्याचं अंग चेपणं, म्हाताऱ्या सासऱ्याच्या पायाला तेल लावून चोळणं इत्यादी कामं ती मन मारुन करत असते. या सर्वातून स्त्रीची होणारी कुचंबना दाखविली आहे. शिवाचे आणि बाळू हातखंबतकर यांचे कडाक्याचे भांडण झाले असताना हातखंबतकर वेडेवाकडे बोलतो त्यावेळी सीता अन्यायाला पेटून उठताना म्हणते, "तोंड सांभाळून बोलं. काय केलं मी? बोला."[१२]

अशी सडेतोड बोलून जाब विचारते. पुढे ती म्हणते, 'तुम्हाला काय वाटतं मला काही कळत नाही? मी काय अडाणी आहे? एखाद्या बाईला वेडवाकडं बोलायला काहीतरी वाटलं पाहिजे. ज्याच्या गळ्यात माळ घातली तोच माझा छळ करतो. त्यात तुम्ही भर घालताय काय?' अशी खंत व्यक्त करते. अशी ही अन्यायाविरूद्ध बंड करुन उठणारी सीता हे स्त्री पात्र समर्पक दाखविले आहे.

माधव कोंडविलकर यांनी 'अनाथ' कादंबरीमध्ये सीताची शिक्षणाविषयी असणारी आवड, तिची शिक्षणापासून वंचित राहण्याची खंत, तिचा व्यसनी बापाकडून व नवऱ्याकडून होणारा छळ दाखविला आहे. शिक्षण घेतलेल्या सुशिक्षित मुलीच्या वाटयाला आलेले दुःख, अन्याय, अनेक चांगल्या स्वप्नांच्या अपेक्षा भंगामुळे झालेला पश्चाताप अशा अनेक प्रसंगांना तोंड देत सीता कसे जीवन जगते याविषयीचे चित्रण केले आहे. शिकलेल्या मुलींचा आजही कसा छळ केला जातो हे माधव कोंडविलकर यांनी सीताच्या रूपातून दाखविले आहे. सुशिक्षित मुलीचा होणारा कोंडमारा कसा होतो याचे प्रत्यंतर सीताच्या पात्रातून समजते..

**शामा :**

शामा हा भास्करचा मुंबईच्या चाळीमधील जिवाभावाचा मित्र आहे. तो भास्करची मनापासून काळजी घेतो. तो भास्करला पडत्या काळात आधार देतो. असा हा शामा भास्करला दुःखात साथ देणारा, आपुलकीने जवळ करणारा, काळजी घेणारा असा आहे. शामामधील इत्यादी गुण दाखवून एखादा व्यसनी माणूस पडत्या काळात कशी साथ देतो हे लेखकाने नजरेस आणले आहे. म्हणून 'रक्ताच्या नात्यापेक्षा मानलेली नाती कशी श्रेष्ठ' असतात हे शामाच्या वर्तनातून माधव कोंडविलकर यांनी वाचकांना दाखवून दिले आहे.

**गोपाळ शिवतरकर :**

शिवतरकर हा मुंबईतील पांडूमास्तरच्या चाळीत राहत असतो. चाळीत राहूनही गुंडगिरीविषयी त्याच्या मनात चीड आहे. शिवतरकरला शिक्षणाची आवड असते. त्यामुळे तो सर्वांना शिक्षणासाठी मदत करतो. तो चाळीतील मुलांना शिका हे तुमचं शिकायचं वय आहे असे चांगले विचार रुजवित असतो. तसेच शिक्षणाशिवाय जगात मान नाही असे सर्वांना समजावून सांगतो. यातून गोपाळ शिक्षणाकरिता सहकार्याची वृत्ती, आणि शिक्षणाला दिलेले महत्त्व दिसते. शिवतरकरच्या माध्यमातून भास्करच्या शाळा प्रवेशासाठी प्रयत्न करणारा एक सामाजिक कार्यकर्ता दाखविला आहे. शिक्षणाशिवाय कोणतेच कार्य होत नाही त्यासाठी शिक्षण घ्या, असा संदेश तो सर्व समाजाला देताना दिसतो.

**पांडूमास्तर :**

पांडूमास्तर हा मुंबईतील चाळीमध्ये राहत असतो. तो गुंडगिरी प्रवृत्तीचा असतो. एखदा सोन्या पांडूमास्तरला म्हणतो भास्करला कुठे तरी ओळखीने शाळेत घाला असे म्हणताच, पांडूमास्तर म्हणतो, 'गावाच्या शाळा काय ओस पडल्या? इकडे कशाला आला. ह्या मुंबईत आधी जागेचा प्रश्न आहे. इथे खायला कोणही देईल, पण कोणी झोपायला जागा देणार नाही.' या विचाराने पांडूमास्तरने मुंबईमधील जागेच्या समस्येवर बोट ठेवले आहे. राजकारणी व्यक्तींच्याकडून प्रथम कामे करुन घ्यावीत आणि नंतर त्यांना मते द्यावीत असा पांडूमास्तर सल्ला देतो. यातून त्याने राजकारणावर प्रकाश टाकलेला दिसतो. या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून मुंबईतील गुंडगिरी आणि भयावह स्थिती लेखकाने उभी केली आहे. त्याचबरोबर मुंबईतील जागेच्या समस्येचा प्रश्न, गुंडगिरी, राजकारण इत्यादींवर प्रकाश टाकला आहे.

**राजाभाऊ सरदेसाई :**

'अनाथ' कादंबरीमधील राजाभाऊ सरदेसाई हे एक  महत्त्वाचे पात्र आहे. सरदेसाई एकदा सातवीच्या निरोपसमारंभाचे अध्यक्ष म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतेवेळी म्हणतात की, ''भावी आयुष्यात काय व्हायचे आहे ते आत्ताच ठरवा. नाहीतर तुम्ही मध्येच लोंबकळत बसाल.''[१३] असे म्हणून भावी आयुष्याची विद्यार्थ्यांना जाणीव करून देतात. माणसाने आतून व बाहेरुन निर्मळ असावं, आत एक व बाहेर एक असं असू नये हे त्यांनी सांगितले आहे. सरदेसाई एकदा भिकाजीच्या घरी गेल्यावर त्याच्या अंगणात पडलेल्या कोबंडीच्या शिटा व पानसुपारीच्या पिचकाऱ्या पाहून ओरडतो, '' भोसडीच्यानो, तुम्ही खाता तिथचं हगता, कोणी कशाला येईल तुमच्या दारात! ''[१४] याठिकाणी सरदेसाई भिकाजीला अस्वच्छतेबद्दल खडसावून बोलतो.

राजाभाऊ सरदेसाई या पात्राच्या रूपातून लेखकाने राजकारण, समाजकारण यासारख्या प्रश्नावर प्रकाश टाकला आहे. तसेच दलितांना मिळणाऱ्या सवलतीतून दारिद्र्य घालविण्यासाठी प्रयत्न करावा, स्वाभिमानाने वागावे, स्वच्छ रहावे, जातीयता पाळू नये, व्यसनापासून दूर रहावे अशा अनेक प्रश्नावर चर्चा केली आहे.

**बाळू हातखंबतकर :**

बाळू हातखंबतकर हा कमी शिकलेला असतो. त्याच्या बोलण्यातून शिक्षणाविषयीची आस्था असलेली दिसून येते. त्यासाठी तो भास्करच्या शाळा प्रवेशासाठी धडपड करतो. आपण शिकलो नाही तरीही आपल्या पोरांनी शिकावं, मोठे व्हावे अशी त्याची भावना आहे. तुम्ही शिका आणि मोठे व्हा. आजकाल

शिक्षणासाठी मान नाही. असा हा बाळू हातखंबतकर दुसऱ्याला शिक्षणाविषयी मार्गदर्शन करून शिक्षणाचे महत्त्व पटवून देतो.

**रामजी सोलगावकर :**

रामजी सोलगावकर ही 'अनाथ' कादंबरीतील व्यक्तिरेखा आहे. तो मुंबईला जातेवेळी भास्करला चुलत्याकडे व्यवस्थित पोहोचवितो असे भिकाजीला वचन देतो. प्रवासामध्ये भास्करला फुलासारखे घेऊन जातो, झोप आली तर त्याला मांडीवर झोपवून घेतो असे म्हणतो. मात्र प्रवासात सोलगावकर भास्करला खूप त्रास देतो. माणसं वचन देतात त्याप्रमाणे प्रत्यक्षात वागत नाहीत हे या व्यक्तिरेखेतून दिसते. लेखकाने या पात्राच्या माध्यमातून आपलीच माणसं आपल्याला कसा त्रास, धोका देतात हे दाखवून दिले आहे.

अशाप्रकारे 'अनाथ' कादंबरीतील व्यक्तिचित्रणे लेखकाने रंगविली आहेत. या व्यक्तिचित्रणातून कादंबरीचा सामाजिक, सांस्कृतिक , शैक्षणिक पट उलगडत जातो. 'चर्मकार' समाजाच्या सामाजिक व शैक्षणिक जीवनाची अत्यंत प्रभाविपणे मांडणी करून लेखकाने स्वतःच्या जीवनातील 'अनाथपणाचा' संदर्भ भास्करच्या रूपाने मांडला आहे. कादंबरीचा पट मोठा असल्याने लेखकाच्या जीवन संदर्भाचे दाखले जसेच्या तसे येतीलच असे नाही. कारण कादंबरी म्हटले की प्रसंग रंगविणे, सजविणे, हे योगाने आलेच. प्रस्तुत कादंबरीतील पात्रांच्या जीवंत व रसरसीतपणामुळे कादंबरीला एक प्रकारची उंची प्राप्त होते.

**'अनाथ' मधील समाजचित्रण :**

कादंबरीच्या उभारणीत समाजजीवनाचा महत्त्वाचा भाग असतो. त्याशिवाय कादंबरी 'पट' विस्तारत नाही. समाजजीवनातील अनेक पदर उलघडत प्रस्तुत कादंबरी पुढे सरकत रहाते. लेखकाला विशिष्ट समाजाचे सामाजिक भान चांगले असेल तर कादंबरी दर्जेदार उतरते.

'अनाथ' कादंबरीमध्ये गावकुसाबाहेर राहणाऱ्या चर्मकार समाजाचे विपुल आणि विविध अंगांनी चित्रण माधव कोंडविलकर यांनी केले आहे. साठोत्तरी मराठी कादंबरीमध्ये गावकुसाबाहेर राहणाऱ्या चर्मकार समाजाचे चित्रण करून माधव कोंडविलकर यांनी मराठी साहित्यात भर घालण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले.

साहित्य आणि समाज यांचे संबंध म्हणजेच साहित्यातील सामाजिकता होय. सामाजिक जीवनाची घडण विविध अंगाने होत असली तरी ती एकात्म असते. साहित्यकृती एकदा अस्तित्वात आली की, ती सामाजिक जीवनाचे एक अविभाज्य अंग बनत असल्याने सामाजिक दृष्टीनेही तिची स्वतंत्रपणे चिकित्सा करणे क्रमप्राप्त ठरते. कोणतेही साहित्य समाजनिरपेक्ष नसते.

'अनाथ' या कादंबरीतून बारा बलुतेदारीचा समाज, त्यांची पद्धती जातीव्यवस्था, ग्रामीण अर्थव्यवस्था, शासन व्यवस्था एका वेगळ्या पातळीवर रेखाटली आहे. त्या दृष्टीने या कादंबरीत वेगळे समाजचित्रण दिसते. विशेषतः चांभार समाजाच्याा चालीरीती, रूढी-रिवाज, अंधश्रद्धा, जातपंचायत व स्त्रीजीवन, सवर्ण व दलित यांचे जीवन 'अनाथ' कादंबरीत दिसते. गावकी, गरिबी, अशिक्षितपणा यांनी चांभार समाजाची होणारी पिळवणूक येथे दिसते.

वर्षभर चप्पलचे लागतील तसे जोड करून द्यायचे. जुने शिवून द्यायचे त्या मोबदल्यात वर्षाला शेरतीन मापटी भात बैतं म्हणून चांभार जातीतील लोकांना मिळत

असत. सणवार वाढून आणायचे मग जेवायचे. वेठबिगारापेक्षा भयानक जीवन या लोकांना जगावे लागते. वेठीला धरून काम करवून घेतले जाते. दूर गावकुसाबाहेर रहायचे. संबंध गावच्या वाहाणाचे काम करून परत भीक मागत जगायचे. वाहाणा करावयास उशीर झाल्यास त्यांची बोलनी खायची. वर तोंड करून कुठं न्याय मागितला तर गावातून चालता होण्याची धमकी दिली जाते. याचे सविस्तर चित्रण करणारी 'अनाथ' ही एक वास्तववादी सामाजिक कादंबरी आहे.

चर्मकार समाजातील लोक स्त्रियांना दुबळी मानतात. चांभार जातीचे कायदे जातपंचायत बनवते. लग्न व मृत्यू हे या समाजातील महत्त्वाचे विधी मानले जातात. या समाजातील कोणताही विधी दारू, माडी पिल्याशिवाय साजरा केला जात नाही. या कादंबरीतील दलित समाजातील महार, मांग, चांभार आणि ढोर यांच्या वस्त्या वेगवेगळ्या ठिकाणी वसलेल्या आहेत. दलितांच्या वस्त्या व घरेदारे त्या समाजाची ओळख करून देण्यास मदत करतात. दलित आणि सवर्ण यांच्यात असणारी तफावत दलितांच्या वस्ती स्थानावरून दिसून येते.

भास्कर शिक्षणासाठी मुंबईला गेला असता, मुख्याध्यापकाकडून मार्कस चांगले असूनही दलित म्हणून शाळेतील प्रवेश नाकारणे हा प्रसंग मन सून्न करणारा आहे. चर्मकार समाजातील लोकांना गटई करण्यासाठी साधी स्वतःची जागा नाही. त्यामुळे ते गटारीच्या शेजारी काम करताना वासाच्या येणाऱ्या दुर्गंधीला तोंड द्यावे लागते. हा चर्मकार समाजाच्या दृष्टीने महत्त्वाचा मुद्दा आहे. माधव कोंडविलकर यांनी मांडला आहे अशा अनेक प्रसंगातून, घटनामधून चर्मकार समाजाच्या वाट्याला आलेले अपमानास्पद वागणुकीचे चित्रण लेखकाने समर्थपणे केलेले आहे.

या जातीतील कायद्याचे स्वरूप विचित्र आहे. या जातपंचायतीमध्ये अंधश्रद्धाळूपणा, शिक्षणाचा अभाव दिसतो. तसेच अनिष्ट परंपरेची जपणूकही दिसते.

चर्मकार समाजातील ही जातीव्यवस्था म्हणजे प्रगतीतील मोठा अडसर आहे. या जातपंचायतीच्या निमित्ताने या समाजातील अंतर्गत रूढी, अंधश्रद्धा, परंपरा, पद्धती यांचे दर्शन घडते. शेकडो वर्षे घुसमटून बसलेल्या पण आतून धुमसणाऱ्या भावना भास्करच्या रूपाने येथे प्रकट होतात. लेखकाची सामाजिक जाणीव येथे प्रकट होते. ती भास्करच्या रूपाने मांडली आहे.

**अन्याय, अत्याचाराचे चित्रण :**

'अनाथ' कादंबरीमध्ये भास्करला जीवन जगत असताना अन्याय, अत्याचार यांना तोंड द्यावे लागते, याचे प्रत्ययकारी चित्रण या कादंबरीमध्ये आले आहे. या कादंबरीतून दारिद्र्याचे भयान वास्तव डोळ्यासमोर येते. 'अनाथ' मधील एका गावकरी भिकाजीने चप्पल वेळेवर पाठवून दिले नाही म्हणून त्याच्या कानशिलात मारतो.

भिकाजी, त्याची बायको, भाऊ हे सर्वजण मिळून कातळावर जमीन तयार करतात. त्यासाठी त्यांना खूप कष्ट करावे लागते. पण दोन वर्षे पीक घेतल्यानंतर गावकऱ्यांनी जमीन काढून घेतली. माधव कोंडविलकर यांनी 'अनाथ' कादंबरीतून गावगाड्यातील व्यवसायात चांभार जातीवर होणाऱ्या अन्यायाचे चित्रण, गावकीची कामे करून होरपळून निघालेल्या भिकाजीचे जीवन अचूकपणे टिपले आहे. चर्मकार समाजातील लोक गरिबीमुळे वाट्याला आलेल्या दारिद्र्यात जीवन जगतात, याचे वास्तववादी चित्रण त्यांनी प्रस्तुत कादंबरीमध्ये केलेले आहे.

या कादंबरीमधील सीता शिकली सवरली असूनदेखील तिचे अशिक्षित, वयाने जास्त असलेल्या शिवाबरोबर लग्न केले. सीताला वडिलांनी दारुच्या व्यसनामुळे शिवाच्या गळ्यात बांधले. शिवा तिच्याकडून लग्नाअगोदर फक्त दोन वेळ जेवण करून देण्याची अपेक्षा व्यक्त करतो. पण लग्नानंतर सीताला गोल साड्या नेसायची

इच्छा असूनही नऊवारी नेसायला लावतो, काठवाले चोळीचे खण, आंबाडा सुटता कामा नये अशी तिला सक्त ताकीद देतो. ती वाचत असलेली पुस्तक फेकून देतो. यासारख्या प्रसंगातून स्त्रीवर होणारा अन्याय दाखविला आहे.

'अनाथ' कादंबरीत आरी, रापी यासारख्या अपुऱ्या साधनाच्या आधारे चांभार समाजाला फाटक्या तुटक्या वाहाणा लावून देणे, देवळातले ढोलताशे चढवून देणे, मृदंगांना वादी लावून देणे, भात्यांचे केस काढून देणे, आणि लागेल तेव्हा चुना पुरविणे. यासारखी कामे करूनही योग्य मोबदला दिला जात नाही. यातून चर्मकार समाजावर होणारा अन्याय दिसून येतो. 'अनाथ' कादंबरीमध्ये भुकेचे चित्रण केले आहे. ते पुढीलप्रमाणे –"त्याला भूक तर सपाटून लागली होती. सकाळी कामावर जाताना दोन चपात्या खायचा. मधल्या सुट्टीत आणि रात्री शाळेतून आल्यावर जेवायचा. मध्ये चहासुद्धा घेत नसे. बरं आता जेवलो नाही तर सकाळी चुलती म्हणेल, 'कुठून तरी जेवून आला असेल. लोकांनी म्हणायला हवं ना चुलती नीट वाढत नाही. प्रपंच करते.' असलं बोलनं ऐकून घ्यावे लागेल, म्हणून त्याने जेवायचा विचार पक्का केला."[१५]

गंगा आपल्या भावाला म्हणते, "घरात काही नव्हतं. दोन्ही पोरं आगीच्या डोंबाची. तीन वेळ नाही, पण दोन वेळ तरी त्याच्या पुढ्यात घालायला हवं ना! गंगीने पंज्याचा विशिष्ट आकार केला; 'बरं, प्रत्येक वेळी लोकांच्या दारात जायचं कसं!' आणि मागायचं कसं? बरं, नीट कोणी घालीत नाहीत. उलट बोलून मात्र घ्यावं लागतं."[१६] चर्मकार समाजातील लोक सकाळ उठल्यापासून झोपेपर्यंत राबून त्यांना साधं दोन वेळचं अन्नही मिळू शकत नाही. यासारखे प्रसंग या कादंबरीत आले आहेत.

**अंधश्रद्धा, रूढी, प्रथा, परंपरा :**

हजारो वर्षापासून भारत देशामध्ये रुढी, परंपरा, अंधश्रद्धा चालत आलेल्या आहेत. शहरी आणि ग्रामीण या दोन्ही भागामध्ये राहणाऱ्या वेगवेगळ्या जातीधर्मामध्ये अंधश्रद्धा, रूढी, परंपरा पूर्वीपासून आजपर्यंत टिकून राहिलेल्या दिसतात. चर्मकार समाज आजही या गोष्टींना महत्त्व देत असलेला दिसतो. समाज जेवढा अशिक्षित, तेवढा जास्तच अंधश्रद्धाळू असतो.

'अनाथ'कादंबरीमध्ये चांभार जातीतील श्रद्धा, अंधश्रद्धा, रुढी, परंपरा, प्रथा याविषयीचे चित्रण आले आहे. चर्मकार समाजावर जातपंचायतीचे वर्चस्व दिसून येते. या कादंबरीमधील भिकाजी नेहमी फाटक्या, तुटक्या वाहाणा लावून देणं, देवळातले ढोलताशे चढवून देणे, मृदंगांना चामड्याचीवादी काढून देणं, बकरीच्या भात्यांचे केस काढून देणे आणि शिंपल्यांचा चुना पुरविणे अशी कामे परंपरेने करीत आलेला दिसतो. परंपरेने जी कामे करावयाची असतात त्यासाठी चांभार लोकांच्या पाळ्या लागतात. ही कामे प्रत्येकजण करण्यासाठी एकेक वर्ष वाटून घेऊन मनपूर्वक करताना दिसतो.

होळीच्या सणांमध्ये चांभारांना अधिक मान असतो असे 'अनाथ' कादंबरीमध्ये चित्रण आल्याचे दिसते. ''आडिवऱ्याच्या महाकालीच्या होळीत चांभाराचा पहिला मान आहे. त्यांनी हात लावल्याशिवाय होळी जाग्यावरून उठत नाही. तसेच सांगण्याच्या कात्रादेवीच्या जत्रेत पहिली मशाल पेटवायचा महारांचा मान आहे. आणि हे कित्येक वर्षापासून चालत आलेले आहे. त्यात कधी खंड पडलेला नाही, की त्यांचा मान कधी कुणी हिसकावून घेतला नाही हे अखंड चालू आहे. आडिवऱ्यामध्ये होळीला चांभाराचा हात लागला नाही तर महाकालीदेवी रागावून बसते. म्हणून मी म्हणतो महारचांभारांनी आपापल्या मानाने राहावं. तुमचं कोणी काही हिसकावून घेणार नाही. अगदी ब्रह्मदेव आला तरी!''[१७] या प्रसंगातून चर्मकार समाजामध्ये रूढी,

अंधश्रद्धा किती खोलवर रूजलेल्या आहेत हे लेखकाने या कादंबरीमधून दाखविले आहे. मुंबईला जाणाऱ्या भास्करचे शिक्षण व्यवस्थित पूर्ण व्हावे म्हणून गंगा देवाला गाऱ्हाणे घालते. मुंबईला गेलेला आपला मुलगा व्यवस्थित वागत नाही हे समजताच भिकाजी निळूकाकांकडे पंचांग बघायला जातो. अशा अनेक उदाहरणावरून चर्मकार समाज खूप अंधश्रद्धाळू असलेला दिसतो.

**प्रसंग निर्मिती :**

कादंबरीच्या निरनिराळ्या घटकापैकी प्रसंग निर्मिती हा महत्त्वाचा घटक व प्रमुख वैशिष्ट्य मानले जाते. कथा, कादंबऱ्यातून काहीतरी घडत असते. किंवा कोणाकडून तरी घडविले जाते. कथानकाचा सांगाडा मुख्यतः निरनिराळ्या प्रसंगातून आवश्यक त्या रितीने आकार घेत असतो. त्यामुळे कादंबरीत कोणती ना कोणती कृती घडते. पात्राच्या द्वारे, एखादी कृती घडविली जाते तेव्हा त्यापाठीमागे कार्यकारणाचे संबंध प्रसंगाचित्रणातून उलघडले जातात, व व्यक्तिपात्राच्या स्वभाव वैशिष्ट्यांवर प्रकाश पडतो. विशिष्ट प्रसंग विशिष्ट तऱ्हेने रंगविण्याची हातोटी लेखकाची असते.

'अनाथ' कादंबरीमध्ये होळीच्या सणामध्ये चर्मकार समाजाला अधिक मान असतो. हे पुढील प्रसंगातून स्पष्ट होते. 'आडिवऱ्याच्या महाकालीच्या होळीत चांभाराचा पहिला मान आहे. त्यांनी हात लावल्याशिवाय होळी जाग्यावरून उठत नाही. तसेच सांगण्याच्या कात्रादेवीच्या जत्रेत पहिली मशाल पेटवायचा महारांचा मान आहे. आणि हे कित्येक वर्षापासून चालत आलेले आहे. त्यात कधी खंड पडलेला नाही, की त्यांचा मान कधी कुणी हिसकावून घेतला नाही हे अखंड चालू आहे. आडिवऱ्यामध्ये होळीला चांभाराचा हात लागला नाही तर महाकालीदेवी रागावून

बसते. म्हणून मी म्हणतो महारचांभारांनी आपापल्या मानाने राहावं. तुमचं कोणी काही हिसकावून घेणार नाही. अगदी ब्रह्मदेव आला तरी!' यासारखे प्रसंग कादंबरीमध्ये आल्यामुळे कादंबरीला विशेष महत्त्व आले आहे.

**वातावरण निर्मिती :**

कादंबरीमध्ये प्रसंगनिर्मिती नंतर वातावरण निर्मितीला महत्त्व आहे. वातावरण निर्मिती करत करत लेखक आपला मुद्दा वाचकावर ठसवित असतो. म्हणून वातावरण निर्मिती प्रसंगानुरूप असावी. वातावरण हा कादंबरीतील पोषक घटक मानला जातो. 'अनाथ' कादंबरीमध्ये वातावरण समर्पक पूर्ण आलेले आहे. 'वातावरण' घटकांवर कादंबरीचे यश अवलंबून असते. वातावरणांमुळे एखादी घटना, प्रसंग जसेच्या तसे डोळ्यासमोर उभे राहतात. 'अनाथ' कादंबरीत माधव कोंडविलकर यांनी समर्पक वातावरणनिर्मिती केलेली दिसते.

या कादंबरीत आलेली वातावरण निर्मिती पुढीलप्रमाणे – शाळेच्या नावाचा फलक वाचून तिघे आत शिरले. खूप मोठं पटांगण, उंच आणि डेरेदार वृक्ष, रंगीबेरंगी फुलझाडं, खेळांची वेगवेगळी साधनं आणि नीटनेटके कपडे घालून हासतखिदळत चालणारी मुलं पाहून भास्कर आश्चर्यचकित झाला. सारं कसे स्वच्छ आणि सुंदर होत. कुठं पाहू आणि कुठलं नको असं त्याला झालं होतं. आता आपल्याला या शाळेत शिकायला मिळेल, या मुलाच्यात खेळायला मिळेल, म्हणून भास्करला आनंद झाला. या वर्णनातून मुंबईतील शाळेचे चित्र उभे राहते.

''सूर्य मावळला होता. कावळे घरट्याकडे कावकाव करीत जोरजोराने पळत होते. गाई हंबरत होत्या भिकाजीची अंगणातल्या अर्धवट केस खरवडलेल्या भात्याकडे नजर गेली. तो झटकन उठला. तिनीसांज होण्यापूर्वी केस काढून पूर्ण व्हायला हवेत.

ह्याची त्याला काळजी लागली. गुरूजी, तुम्ही बसा मी काढून पुरे करतो. रात्र झाल्यावर मग काही दिसणार नाही.''[१८] यावरून सांजवेळचे वातावरण त्यामुळे भिकाजीची कामासाठी चाललेली घाई याविषयीचे वर्णन येते.

''घोडा गर्दीतून वाट काढीत टकाव टकाव करीत धावत होता. माणसं पायांना भिंगरी लावल्यागत पळत होती. मोटारी धाडधाड करीत उडत होत्या. आणि भास्कर बावचाळल्यागत न्याहाळीत होता. कारण देवाच्या गोठण्यासारख्या अत्यंत मागासलेल्या खेड्यातून तो प्रथमच मुंबईत जात होता.''[१९] यासारख्या वातावरणातून मुंबईतील रहदारीची जाणीव होऊन खेडे आणि शहर यातील फरक समजून येतो.

अशाप्रकारे कोंडविलकर यांनी कादंबरीमध्ये आवश्यक तेथे वातावरणनिर्मिती केल्याने 'अनाथ' कादंबरी उठून दिसते.

**संघर्ष :**

संघर्ष हा कादंबरी रचनेचा महत्त्वाचा घटक आहे. त्या दृष्टीने 'अनाथ' या कादंबरीतील संघर्ष सामान्यपणे तीन प्रकारचा आहे. १. व्यक्ती-व्यक्तीतील संघर्ष २. व्यक्ती-परिस्थितीतील संघर्ष ३. कुटुंब-कुटुंबातील संघर्ष अशा संघर्षाच्या विविध मानसिक पायऱ्या येथे दिसतात.

संघर्षाच्या चढ-उतारांनी 'अनाथ' कादंबरी रंजक आणि वाचनीय बनली आहे. माणूस हा जन्माने श्रेष्ठ नसून कर्माने श्रेष्ठ ठरतो. भास्कर ही या कादंबरीतील प्रमुख व्यक्तिरेखा आहे. 'अनाथ ' या कादंबरीमध्ये आई-वडील असूनही एक हुशार मुलगा येणाऱ्या परिस्थितीला कसे तोंड देतो याचे संघर्षमय चित्रण आले आहे. भास्करने वाट्याला येणारे दुःख, अपमान, जातीयता, अन्याय आणि अत्याचार याविरूद्ध संघर्ष दिलेला आहे.

भिकाजीचे चांभारकीचे काम घाण्याच्या बैलाला जुपल्यासारखं सतत चालू असतं. त्याच्या या कामातूनच कादंबरीतील संघर्षा सुरूवात होते. तो भरपूर काम करतो. दोनवेळचे जेवायला मिळावे एवढीच त्याची प्रामाणिक इच्छा आहे. पण ती त्याची इच्छा पूर्ण होत नाही. कारण नियतीने त्याच्या नशिबी दुःखच दिले आहे. व्यक्ती आणि परिस्थिती यांच्यातला संघर्ष येथे दिसतो. भिकाजी सामान्य माणूस आहे. त्यामुळे परिस्थितीशी धैर्यानं तोंड देण्याचे सामर्थ्य त्यांच्यात नाही. त्यामुळे तो दुबळा बनतो. भिकाजी व परिस्थिती यांच्यातील संघर्षाची या कादंबरीत बरीच उदाहरणे आहेत. भिकाजी प्रमाणे गंगासुद्धा अनेक प्रकारचे काम करून संघर्ष देत जीवन जगताना दिसते.

गंगा व गोपिका या दोन स्त्रिया चांभार जातीतील स्त्रियांचे दुःख व्यक्त करतात. स्त्री दुबळी असली तरी प्रसंगी ती कशी उभी राहू शकते हे गंगाच्या कणखरपणातून दिसून येते. सीता या स्त्री पात्रातून लेखकाने स्त्रीवर अन्याय झाला तर ती कशी संघर्ष करते यांचे चित्रण केले आहे. एका बाजूला भयानक दारिद्र्य आणि दुसऱ्या बाजूला जातीचे मागासलेपण यात भिकाजी आणि त्याचं कुटुंब भरडलं जातं व्यक्ती व परिस्थिती या संघर्षाबरोबर व्यक्ती-व्यक्तीतील संघर्ष कुटुंबा-कुटुंबातील संघर्ष या कादंबरीत दिसतो. भास्कर हा दलित असल्यामुळे प्रिन्सिपॉलने शाळा प्रवेश नाकारल्यामुळे तो दिवसभर काम करून रात्रीची शाळा शिकतो. यातून भास्करने परिस्थिती विरूद्ध दिलेला संघर्ष दिसून येतो.

मुंबईतल्या झोपडपट्टीतील जीवनपद्धती, गुंडगिरी, चुलता व चुलतीने दिलेल्या मानसिक त्रास, तसेच रामा मेहुण्याने दिलेला त्रास यासारख्या प्रसंगावरून भास्करचे संघर्षमय जीणे दिसून येते.

शेवटी काही असंघटीत समाजाची दुःस्थिती ही आपल्या आजच्या प्रस्थापित समाजरचनेचा अपरिहार्य भाग आहे. हे या कादंबरीत स्पष्टपणे जाणवते. हाच या कादंबरीतील व्यक्ती–कुटुंब परिस्थिती दर्शक संघर्ष होय. या कादंबरीतील प्रत्येक पात्र संघर्ष करून जगताना दिसते.

**निवेदनपद्धती :**

निवेदनपद्धती हा कादंबरीचा महत्त्वाचा घटक आहे. निवेदनामुळे कादंबरीचे कथानक पुढे सरकत जाते. कथानकाला गती येते. निवेदनपद्धती आकर्षक असेल तर कादंबरी समजण्यास सोपी होते. 'अनाथ' कादंबरीतील निवेदक भास्कर आहे. घरची गरिबी असून देखील तो शिक्षणाविषयी जी धडपड करतो. याचा विस्तृत पट लेखकाने भास्करच्या निवेदनातून सांगितला आहे. जरी हा निवेदक असला तरी त्याच्या तोंडून कोणी तरी दुसरीच व्यक्ती बोलते असे जाणविल्याशिवाय राहत नाही. भास्कर शाळेत हुशार आहे. त्यामुळे त्याच्यावर सोहनी गुरूजी खूष आहेत. सोहनी गुरूजी भास्करच्या वडिलांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देतात. पुढील शिक्षणासाठी त्याला मुंबईला पाठवून द्या असे सांगतात. त्यामुळे तो खूष होतो. आता आपले वडिल पुढील पुढील शिक्षणासाठी पाठवून द्या, असे सांगतात. आता आपले वडील पुढील शिक्षण पूर्ण करण्यासाठी पाठवून देणार म्हणून भास्कर आनंदी होऊन मुंबईच्या शाळेतील स्वप्नात दंग होतो.

भास्करच्या घरी वडिलांना दारूचे व्यसन असल्यामुळे त्याला दारूविषयी चीड आहे. म्हणून भास्कर वडिलांना चिडून म्हणतो, ''अंगावर कपडे मिळत नाहीत. पोटाला अन्न मिळत नाही. आणि तुम्हाला हे नसते धंदे कशाला.''[२०] असे दारूविषयी विद्रोहाने विचारणारा निवेदक आहे. भास्कर चर्मकार समाजातील असल्याने

दुःखाचे अनेक अनुभवले आहेत. गावातील सवर्ण लोक चर्मकार समाजाला कमी लेखत असून शिवाशिव पाळत असतं याची त्याला चीड येते.

सवर्ण लोक शिवाशिव पाळतात त्यावेळी भास्करला वाटते 'खेड्यापेक्षा शहर बरे' कारण शहरात कोणता माणूस कोणत्या जातीचा आहे हे ओळखता येत नाही. महात्मा गांधीजी यांनी 'शहरातून खेड्याकडे चला' हा मंत्र आपल्या अनुयायांना दिला होता. त्याच्या उलटी भूमिका भास्करच्या तोंडून व्यक्त झाल्याचे पाहावयास मिळते.

**संवाद :**

कादंबरीच्या रचना वैशिष्ट्याचा विचार करताना कादंबरीचे अर्धे यश संवादलेखन व त्यातील भाषेवर अवलंबून असते. त्यातूनच व्यक्तिरेखांचे स्वभावधर्म, समाजदर्शन, जाती-जातीच्या पद्धती, रीतीरिवाज आपल्याला कळत जातात.

लेखकाने राजापूरी बोलीतील संवादानी वेगळेच कौशल्य साधले आहे. मराठीमध्ये दक्षिण कोकणच्या राजापूरी बोलीचे प्रथमच दर्शन दलित कादंबरीत घडते. कोंडविलकर यांचे भाषा-संवादाच्या बाबतीतील हे वेगळेपण महत्त्वाचे आहे.

'अनाथ' कादंबरीतील संवाद हा घटक महत्त्वाचा मानला जातो. व्यक्तिचित्रणे डोळ्यासमोर उभे करण्याचे सामर्थ्य संवादामध्ये असते. संवादामुळे कादंबरीतील पात्रे उठावदार दिसतात. कादंबरीचे कथानक गुंफण्यास संवादाची मदत होते. या घटकामुळे व्यक्तिमधील गुणदोष समजून येतात. 'संवाद' या घटकामुळे कादंबरीचा विकास होत असतो. संवादाच्या बाबतीत लेखक पात्रांच्या मनात शिरून त्यांच्या ह्रदयांतर्गत खळबळीचा आविष्कार घडवतो. प्रसंगी निर्जीव वस्तूच्या पोटात व मनातही तो शिरतो. सातवीच्या निरोप समारंभाच्या वेळी भास्कर व सोहनी गुरूजी यांच्या संवादातून त्यावेळचा प्रसंग उभा राहतो.

भास्करच्या ॲडमिशनसाठी एका शाळेत गेल्यानंतर प्रिन्सिपॉल आणि शिवतरकर यांचा संवाद पुढीलप्रमाणे -

''कुठल्या शाळेतून आलास? कागद हातात घेत प्रिन्सिपॉल म्हणाले.

'गावचा' शिवतरकर पटकन बोलला.

'पण आमच्या सर्व जागा भरल्या आहेत.' तोंड वेडंवाकडं करीत प्रिन्सिपॉल म्हणाले.

'साहेब गरीब आहे.' शिवतरकर अजिजीने म्हणाला.

'मार्क किती आहेत?'

'त्रेसष्ठ टक्के आहेत', असं म्हणत शिवतरकरने गुणपत्रक पुढे केलं.

'इतके मार्क?' प्रिन्सिपॉलना आश्चर्य वाटलं.

'होय साहेब -पोरगा हुशार आहे.'

प्रिन्सिपॉलन चष्म्याच्या आडून भास्करला न्याहाळलं. त्याच्या चेहऱ्यावर कौतुक मिश्रित समाधान तरंगलं पण ते फार काळ टिकलं नाही.

'हरिजन आहे का?' सर्टिफिकेट वाचता वाचता प्रिन्सिपॉल बोलले.

'होय, साहेब.'

प्रिन्सिपॉल दोन तीन मिनिटं तिघाकडे पाहत राहिला आणि मग कपाळावर आठ्या पाडीत म्हणाला, 'कठीण आहे.'

'काय साहेब-'

'आमच्या शाळेत आता जागा शिल्लक नाहीत. गेल्या आठवड्ययातच सगळ्या जागा भरल्या. आधी येता तर'-

'नाही साहेब गावाकडून यायला थोडा उशीर झाला. कुठेतरी जरा बघा. मेहरबानी होईल. त्याची शिकायची खूप इच्छा आहे', शिवतरकरला कळवळून म्हणाला.

'तुमचं सगळं खरं आहे, पण?' त्यांनी पुन्हा प्रश्नचिन्ह टाकलं.

'साहेब पोरगा गरीब आहे',

'होय ते मला कळलं. पण आम्ही डोनेशिवाय कुणाला घेत नाही. तुम्हाला ते परवडल का?''[२१] साहेबांनी स्पष्ट केलं.

असे संवाद कादंबरीत आल्याने कादंबरी रंजक आणि वाचनीय बनली आहे. संवादामुळे व्यक्तीमधील स्वभाव, गुणदोष, बोलण्याची ढब समजण्यास मदत होते. कुशल, जीवनानुभूतीचा प्रत्यय दणारे, अर्थपूर्ण संवाद हे या कादंबरीचे महत्त्वाचे रचनावैशिष्ट्य आहे. संवाद हा कादंबरीचा गाभा असतो असे म्हटले तरी वावगे होणार नाही.

**भाषाशैली :**

भावना व विचार व्यक्त करण्याचे साधन म्हणजे भाषा होय. लेखकानुसार भाषेचे स्वरूप बदलते. त्याप्रमाणे कादंबरीतील पात्रानुसार भाषाही वापरलेली असते. कादंबरीतील पात्रे, प्रसंग, निवेदन, संवाद यानुसार भाषा बदलत असते. पात्रानुवर्ती भाषा ही गोष्ट आज कादंबरीत महत्त्वाची मानली जाते.

भाषाशैली हा कादंबरीतील महत्त्वाचा घटक असून त्याशिवाय कादंबरी अस्तित्वात येऊ शकत नाही. भाषाशैली ही व्यक्ती, प्रदेश, व्यवसायानुसार बदलते. म्हणूनच शैलीची व्याख्या करताना भालचंद्र नेमाडे म्हणतात. ''एखाद्या द्रव्याला, विशिष्ट रूपामध्ये प्रकट करण्याकरिता वापरल्या जाणाऱ्या तंत्र समुच्चयाची पद्धती म्हणजे शैली होय.''[२२]

प्रादेशिक कादंबरीत भाषा हा अत्यंत महत्त्वाचा घटक असतो. कारण ज्या प्रदेशातील कथानक कादंबरीकार रंगवितो त्या प्रदेशातील भाषा त्याला स्वीकारणे वातावरण निर्मितीच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. 'अनाथ' या कादंबरीमध्ये प्रादेशिक कादंबरीचे अनेक गुण विशेष पहावयास मिळतात.

माधव कोंडविलकर यांनी आपल्या अनुभवांची मांडणी राजापूरी कोकणी भाषेत केल्याने त्यांच्या साहित्याला एक वेगळेपणा आलेला आहे. भाषेमुळे चर्मकार समाजातील रूढी, परंपरा, चालीरीती, दारिद्र्य, शिक्षणाची धडपड आणि समाजदर्शन अधिक प्रभावी झाले आहे. सवर्णाकडून झालेल्या छळाबद्दल लेखन करताना कुठेही आक्रस्ताळेपणा, उरबडवा आक्रोश आढळत नाही. 'अनाथ' कादंबरीची भाषाशैली परिणाम कारकरित्या प्रकट केल्याने भास्करची शिक्षणाविषयीची धडपड वाचकाच्या हृदयापर्यंत जाऊन भीडण्यास यशस्वी ठरली आहे.

घरच्या कामात भास्करने मदत करावी अशी वडिलांची अपेक्षा असते. त्यावेळी भिकाजी भास्करला म्हणतो, "बाबू, उद्या सकाली सालत जाव नको; भिकाजी अंगावर पांघरूण ओढून घेत भास्करला म्हणाला,

'गुरूजी ओरडतील ते! भास्कर धस्कून म्हणाला, 'हल्ली पाच मिनीटं उशीरा गेलो तरी ते ओरडतात.'

'अरे, पण येवडी थाल निवडून होवस नुको काय?' भिकाजी रागाने बोलला, 'शाला येक येल चुकली म्हणून काय व्हताय?' कुलवाड्यांची पोर बग जा- आटआट धाधा दिवस शालेचा ताँड बगीत नायूत. ता सीत्या मुलमाचा पोर बगावा तवा आप्ला गोर्वांकडे अस्तो. पर्वा त्यास ती सहज म्हटलं - तू सालत जायत् नायस काय रे? तसा म्हनास लाग्ला, 'आता शेताची कामा पुरी झाली की जायन. बाबा सधा भाजावलीस लागलायूत ना! म्हणून मी बैल शकता.' आनि तूज येक दिवस ऱ्हा म्हटला तर असा

नि तसा सागंतोस. आता शालत जावूस हवा ह्या खरा, पन अडीअडचनीस कामास पन ऱ्हावूस हवा.''[२३] इथे भिकाजी शिक्षणाला दुय्यम स्थान देताना दिसतो. भास्करने शाळा चुकवून घरची कामे करावीत असे त्याला मनोमनी वाटते.

भास्करचा मित्र शाम्या हा मुंबईतील वरळी झोपडीत राहत असतो. शाम्याच्या माध्यमातून मुंबईकरांची भाषा दाखविली आहे. शामा मवाली, गुंडगिरी , गरिबी यामुळे मनात असणारा तिटकारा व्यक्त करतातना म्हणतो, – ''भैंचोद, ह्या झोपडपट्टीने आपल्याला वैताग आणलायं, शाम्या चिडून बोलला, 'साला पावसाने त्यात राडा केलाय. फुटपाथवर झोपेन म्हटलं तर तिथे सगळा चिखल आणि आत साली रांड जीव हैराण करते.''[२४]

लेखकाने राजापूरी कोकणी बोलीचा वापर करून, मराठी वाङ्मयात मोलाची भर घातली. चर्मकार समाजामध्ये वापरले जाणारे शब्द, म्हणी, वाक्प्रचार, प्रतिमा, उपमा यांचा परिचय मराठी भाषेला करून दिला. वरील सर्व घटकांच्या आधारे 'अनाथ' कादंबरीची भाषा इतर कादंबरीच्या मानाने वेगळेपण दाखविते. यातच 'अनाथ' कादंबरीचे सामर्थ्य दडलेले आहे असे म्हणता येईल.

**वाक्प्रचार, म्हणी, प्रतिमा व प्रतीक :**

साहित्याच्या व्यवहारात वाक्प्रचार, म्हणी, प्रतिमा आणि प्रतीक या घटकांचे महत्त्वाचे स्थान आहे. म्हणी व्यवसायाशी निगडीत आहेत. तसेच व्यवहारज्ञान सूचित करणारे काही विचारही आहेत. चांभार समाजातील काही वाक्प्रचारही पाहाण्यासारखे आहेत. माधव कोंडविलकर यांनी 'अनाथ' मध्ये वरील घटकांचा वापर केल्यामुळे कादंबरीला वैशिष्टपूर्ण स्थान प्राप्त झाले. या घटकांमुळे कादंबरीचे सौंदर्य वाढले आहे. 'अनाथ' कादंबरीची भाषाशैली उठावदार बनवण्यास वाक्प्रचार, म्हणी, प्रतिमा

या घटकांनी अधिक भर घातल्याचे दिसते. माणसांचे स्वभाव, वातावरण, प्रदेश समजण्यासाठी योग्य त्या ठिकाणी वरील घटकांचा वापर केला आहे. त्यामुळे 'अनाथ' कादंबरी नावारूपाला आली आहे, असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. लेखकाने वाक्प्रचार, म्हणी, प्रतिमा, प्रतीक वापरून मराठी भाषेत भर घालण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे.

नरडीचा घोट घेणे, पायपीट करणे, तोंडत मारणे, आश्चर्य चकित होणे, काखा वर करणे, मग्न होणे, काळजाचं पाणी होणे, मनातल्या मनात चरकणे, अपराधी होणे, तोंडावर वसाडी पडणे, आभाळाला हात टेकणे, देवाला गाऱ्हाणे घालणे यासारखे अनेक वाक्प्रचार वापरल्याने 'अनाथ' कादंबरी रंजक व वाचनीय बनली आहे.

देव देतो आणि कर्म नेतं, आवळा देऊन कोहळा मागायला येणे, पायातली वाहाण पायात असावी, पाण्यात हगलं तरी ते वर आल्याशिवाय राहत नाही, भट म्हणतो भटणीला अख्खा बांगडा चटणीला, सादे ते सोदे असतात, पाठीवर मारावं पण पोटावर मारू नये इत्यादी म्हणीचा वापर केल्यामुळे कादंबरीचे सौंदर्य वाढले आहे.

बैलांनी डुरकावं तसं बाप व चुलता घोरत होते, गंगी वाघिणीसारखी पिसाळून ओरडत होती, धबधब्यासारखे बोलणे, अक्षर मोत्याच्या दाण्यासारखं होतं. यासारख्या प्रतिमा व उपमांचा वापर केल्याने 'अनाथ' कादंबरीत महत्त्वपूर्ण ठरली आहे. कादंबरीत वरील घटकांचा वापर केल्याने भाषेला महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त झाले आहे.

**'अनाथ' मधील राजापूरी कोकणी शब्द :**

रापवणे, बापूस, खय, काय गो, वाहाणा, बेस झालं, डुंगा, द्येवस, येक, येल, मार्लान, बगतलाव्, ऱ्हावस, खालाव्, पिलाव, द्येवची, नाय, थय, यासारख्या अनेक

कोकणी शब्दाची मराठी वाङ्मयात माधव कोंडविलकर यांनी भर घातली आहे. वरील शब्द चांभार जमातीतील भाषेचे विशेष स्पष्ट करतात.

**समारोप :**

अशाप्रकारे 'अनाथ' कादंबरीमध्ये दलित समाजातील चर्मकार समाजाची होणारी उपेक्षा माधव कोंडविलकर यांनी मांडली आहे. या कादंबरीतील नायक भास्करच्या भोवती ही कादंबरी गुंफलेली आहे. भास्करचे वडील हे जातीव्यवस्थेत भरडल्या गेलेल्या चांभार जातीत जन्मल्याने जाती परंपरेने चालत आलेला व्यवसाय करीत असतो. 'अनाथ' कादंबरीमधून चर्मकार समाजातील होतकरू मुलगा घरची प्रतिकुल परिस्थिती असतानाही शिक्षण घेतो. याचे प्रत्ययकारी चित्रण आले आहे.

शेकडो वर्षे घुसमटुन बसलेल्या पण आतून धुमसणाऱ्या भावना भास्करच्या रूपाने प्रकट होतात. दलित कादंबरी वैशिष्ट्यापैकी उद्वेग, नकार, विज्ञानवादी दृष्टी यांचा प्रभाव भास्करवर पडलेला आहे. मुंबईसारख्या ठिकाणी असणारा जागेचा प्रश्न, शाळा प्रवेशातील गैरप्रकार, गुंडगिरी, झोपडपट्टी यांचे वर्णन आले आहे.

'अनाथ' कादंबरीतील ग्रामीण जीवन त्यातही अस्पृश्य समाजाचे जीवन अतिशय बिकट आहे, याची जाणीव वाचकाला झाल्याशिवाय राहत नाही. भारताने १९४७ ला स्वातंत्र्याचा सूर्य पाहिला पण कोकणातील अनेक खेडे, गावात या स्वातंत्र्यसूर्याचा प्रकाशकिरणही पोहोचलेला नाही. हे माधव कोंडविलकर यांना या कादंबरीच्या निमित्ताने दाखवावयाचे आहे.

लेखकाला येथे दलित कादंबरीतील विद्रोह दाखवण्याऐवजी अपेक्षाभंगाचे, मानहानीचे, दारिद्र्याचे, दुःखाचे, रूढी परंपरा आणि अंधश्रद्धा यांच्या चक्रात सापडलेल्या जीवनाचे चित्रण लेखकाला साकार करावयाचे असावे असे वाटते.

सुरूवातीपासून ढवळून निघालेले कथानक संघर्षापर्यंत जातच नाही. भास्करची व्यक्तिरेखाही तशीच आहे. लेखकानेही कादंबरी लिहून आपल्या समाजाची दुःस्थिती दाखविली आहे. वेदनेचे बोलके चित्रण म्हणजे भास्कर ही व्यक्तिरेखा होय.

'अनाथ' कादंबरीत एका दलित मुलाची शिक्षणाकरिता होणारी ससेहोलपट चित्रित केली आहे. भास्कर मधील कष्टाळूपणा, अभ्यासूवृत्ती, प्रेम, जिव्हाळा, शिक्षणाविषयीची तळमळ, जिद्द इत्यादी गुणांचे दर्शन होते. तसेच या कादंबरीमध्ये म्हणी, वाक्प्रचार, चर्मकार समाजाची भाषा, राजापूरी कोकणी भाषा यांचा वापर करून कादंबरीचे वाङ्मयीन मूल्य वाढले आहे. तसेच समाजिक व सांस्कृतिक व शैक्षणिक, जीवनाचे प्रभावी चित्रण केले आहे. दलित समाजातील शिक्षणाची आवड निर्माण होणारा तरूण, त्याला विरोध करणारी जुन्या विचाराची चर्मकार मंडळी याचे प्रभावी चित्रण प्रस्तुत कादंबरीत येते. त्यामुळे ही कादंबरी दलित कादंबरी वाङ्मयात मोलाची भर घालेल असे वाटते.

## संदर्भ सूची


१. कुलकर्णी, गो.म. : दलित साहित्य प्रवाह आणि प्रतिक्रिया ( कोंडविलकर यांची मुलाखत ) प्रतिमा प्रकाशन पुणे, आवृत्ती पहिली. १९८६ पृष्ठ क्र. ६९.

२. कोंडविलकर, माधव : ‘ अनाथ ’ पॉप्युलर प्रकाशन पुणे, दुसरी आवृत्ती, १९९९, पृष्ठ क्र.१३.

३. तत्रैव, पृष्ठ क्र.१६.

४. तत्रैव, पृष्ठ क्र.१५.

५. तत्रैव, पृष्ठ क्र.५५.

६. तत्रैव, पृष्ठ क्र.९५.

७. तत्रैव, पृष्ठ क्र.१.

८. तत्रैव, पृष्ठ क्र.५.

९. तत्रैव, पृष्ठ क्र .१७६

१०. तत्रैव, पृष्ठ क्र.१११.

११. तत्रैव, पृष्ठ क्र.११४ .

१२. तत्रैव, पृष्ठ क्र.५५ व १५४.

१३. तत्रैव, पृष्ठ क्र.५९.

१४. तत्रैव, पृष्ठ क्र .६४.

१५. तत्रैव, पृष्ठ क्र.१६७.

१६. तत्रैव, पृष्ठ क्र.२९

१७. तत्रैव, पृष्ठ क्र.६३.

१८. तत्रैव, पृष्ठ क्र.९१.

१९. तत्रैव, पृष्ठ क्र.१००.

२०. तत्रैव, पृष्ठ क्र.१८५.

२१. तत्रैव, पृष्ठ क्र. १४१.

२२. नेमाडे, भालचंद्र : 'टीकास्वयंवर' ,
साकेत प्रकाशन, औरंगाबाद.
आवृत्ती पहिली १९९०,
पृष्ठ क्र.१६७.

२३. कोंडविलकर, माधव : 'अनाथ' ,
पॉप्युलर प्रकाशन, मुंबई उ. नि. पृष्ठ क्र.१४.

२४. तत्रैव, पृष्ठ क्र.१८८.